ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

# Printing Area®

Peer Reviewed International Refereed Research Journal
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed Pin-431126 (Maharashtra)

Cosmos IMPACT FACTOR 5.395

## Certificate Of Publication

This is to certify that the review board of our research journal accepted the research paper/article titled "prachin Bhartatil shreni sanghtnanche swarup Ani tyanche yogdan" of Dr./Mr./Miss/Mrs. Sunewar Kishan Ramlu

It is peer reviewed and published in the Issue-60 Vol.-02 in the month of December - 2019.

Thank you for sending your valuable writing for printing area Journal

Impact Factor 6.039

Govt.of India, Trade Marks Registry Regd.No.3418002

ISSN 2394-5303

Editor in chief
Dr.Bapu G.Gholap

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Adat Vyapari Education Society's
Degloor College, Degloor
Dist.Nanded

# Printing® Area

Issue-60, Vol-02 December 2019

Peer Reviewed International Refereed Research Journal

Editor
Dr.Bapu G.Gholap

ISSN: 2394 5303 | Impact Factor 6.039(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | December 2019 Issue-60, Vol-02


# Index

01) SIGNIFICANCE OF BASIC FIVE SYMBOLISED ELEMENTS (PANCHAMAHBHUTAS) IN ...
Dr. Archana S. Giri, Aurangabad ||14

02) A STUDY OF SPORTS CONTEST ANXIETY TEST AMONG SCHOOL LEVELS JUDO ...
Dr. Kadam R. M., Digras ||18

03) A COMPARATIVE STUDY OF DEVELOPMENT OF REACTION ABILITIY IN NORMAL ....
Dr. Shatrunjay M. Kote, Aurangabad, Maharashtra ||23

04) RIGHT TO INFORMATION GOOD GOVERNANCE BREAKING THE BUREACRATIC ...
Dr. Gopichand & Neelam Rani, Meerut (U.P.) ||28

05) IMPORTANCE OF POST-COLONIAL LITERATURE IN ENGLISH
RABIYA PERWEEN, MADHEPURA ||33

06) Book Review
Dr. Md. Nurul Amin Sheikh, Dhubri, Assam ||38

07) The God of small Things Contemporary Feminist Approach
Prof. Shreekrishna Tidke, Aurangabad ||40

08) Declining Strength of Students in the Colleges
Gaurav Kumar, Mahilpur ( Hoshiarpur) ||42

09) SOCIAL LIFE AND EDUCATION IN BIHAR ON THE 19TH CENTURY
Dr. GOPAL KUMAR (ROSERA), Gopalganj, Bihar ||46

10) Empowerment of Women Through Panchayat Raj System
Dr. Siddhartha Verma, University Patna ||51

11) आश्रमशाळेतील भौतिक सुविधांच्या अभावामुळे शिक्षकांच्या अध्यापनावर होणारा परिणाम- ...
प्रा. रंजना व्ही. तिजारे, नागपूर ||54

12) महात्मा गांधी यांचे आहार व आरोग्य विषयक विचार
डॉ. पाळणे कैलास शिवहरराव, नळेगाव ||60

13) गझलकार – सुरेश भट
प्रा. डॉ पंडित आनंदराव शिंदे, जि. नांदेड ||61

http://www.printingarea.blogspot.com
www.vidyawarta.com/03

175



14) भास्करायरचित सौभाग्यभास्कर भाष्याआधारे ललितासहस्रनाम स्तोत्रातील नासिक ...
डॉ. मेघा देशपांडे, मुंबई विद्यापीठ ||63

15) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संसदीय लोकशाही संबंधी विचार
प्रा. डॉ. वसंत आबासाहेब खरात, संगमनेर ||68

16) भारतीय अर्थव्यवस्थेवर वस्तु व सेवा कराचे झालेले परिणाम
डॉ. श्री. अमृता गणपती मगदूम, जि. कोल्हापूर, राज्य महाराष्ट्र (इंडिया) ||73

17) ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील जागतिकीकरण व उदारीकरणाचे परिणाम
प्रा. राठोड बी. जे., जि. बीड ||78

18) राष्ट्र उभारणीत राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान
प्रा ज्ञानोबा त्रिंबक ढगे, जि. नाशिक ||81

19) भारतातील खादी उद्योगाचे अर्थविश्लेषण
प्रा.डॉ. रिता आर. राऊत, जि. भंडारा ||84

20) मध्ययुगीन महाराष्ट्रातील बलुतेदारी पध्दत
डॉ. मीना चंद्रभान साळे, अहमदनगर ||87

21) लातूर जिल्ह्यातील उग्र शैव शक्ती प्रतिमा
डॉ. सोमवंशी एस. आर., जि. लातूर ||89

22) ग्रामीण भागातील वृद्धांच्या कौटुंबिक, आर्थिक आणि आरोग्यविषयक समस्यांचे ...
डॉ. विजयता विटणकर, वर्धा ||92

23) प्राचीन भारतातील श्रेणी संघटनांचे स्वरुप आणि त्यांचे योगदान
प्रा.डॉ. सुनेवार किशन रामलू, जि. नांदेड ||99

24) भारतीय संगीतातील कंठसंस्काराचे महत्व
डॉ. स्नेहल दत्तात्रय शेंबेकर, अकोला ||103

25) मार्कण्डेय पुराण के सन्दर्भ में देवी स्वरूप का वर्णन
अवनी जैसवाल ||106

26) अल्का सरावगी के कथा साहित्य में स्त्री प्रतिरोध का स्वर
डॉ. श्रीमती मंजुला जोशी & श्रीमती सुनिता चौहान, बडवानी (म.प्र.) ||109



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

* Wst.Nanded *



५. गोडबोले अरविंद, १९७४, वृद्धा आणि त्यांचे प्रश्न, नागपूर, पॉप्युलर प्रकाशन.

६. हडप गोविंद जी.,२००७, वृद्धांच्या सामाजिक समस्या आणि ज्येष्ठांचे समुपदेशन, नागपूर डिस्ट्रीब्युटर्स.

७. जाधव के. एम., २०१२, वैकासिक मानसशास्त्र, पुणे, डायमंड प्रकाशन.

८. खडसे भा. की, १९७९, भारतातील सामाजिक सामाजिक समस्या, नागपूर, मंगेश प्रकाशन.

९. मायी सुनिल, २०१२, व्यक्ती आणि सामाजिकता, पुणे, डायमंड प्रकाशन.

१०. पोतदार शंकरराव, १९१८, वृद्धत्व, समस्या आणि उपाय, मुबंई पॉप्युलर प्रकाशन.

□□□

**23**

# प्राचीन भारतातील श्रेणी संघटनांचे स्वरुप आणि त्यांचे योगदान

प्रा.डॉ. सुनेवार किशन रामलू
इतिहास विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय देगलूर, ता. देगलूर, जि. नांदेड

मानुस हा समाजशिल प्राणी आहे. असुरक्षीततेच्या कारणाने मानूस नेहमी संघटित रुपात राहत आला आहे. सामुहिक हितसंबंधाच्या स्वार्थातुनही समाज संघटीत होत आला आहे. याचाच एक भाग म्हणजे प्राचीन भारतात व्यापारी, उद्योजक, व्यावसायीक हे संघटीत झाले. त्यांच्या संघटनानांच श्रेणी असे म्हणतात. त्या श्रेणी संघटनांनी स्वत:ची नियमावली बनविली होती. त्या श्रेणी संघटनांची स्वतंत्र कार्यकारीणी च कार्यपध्दती होती. त्या - त्या काळातील राजांनीही त्या श्रेणी संघटनांच्या नियमावलीला आणि त्यांच्या कार्यकारीणीला आणि कार्यपध्दतीला मान्यता दिली होती. त्या श्रेणी संघटनांच्या प्रमुखांना वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळी नावे होती. सेट्ठी, ज्येष्ठक, श्रेष्ठी, श्रेष्ठीय, कुलक, कुलश्रेष्ठी, गणप इत्यादी नावाने ओळखले जात होते. महावग्ग ह्या बौध्द साहित्यानुसार श्रेणी प्रमुख राजाला प्रशासनात आणि न्यायदानात सहकार्य देत होते. राजा श्रेणींच्या कार्य संचालनात हस्तक्षेप करत नव्हते. अशा ह्या श्रेणी संघटनांचा पुर्वइतिहास पुढीलप्रमाणे सांगता येतो.

**श्रेणी संघटनांचा उदय -**

श्रेणीचा उल्लेख ऋग्वेदात आला आहे तो असा च हंसा इव श्रेणीशोयतन्ते छ म्हणजे ऋग्वेदकाळात श्रेणी/पणी ही व्यापारी संघटना हंसांप्रमाणे काम करते आहे. ' यावरुन स्पष्ट आहे की, श्रेणीचा उल्लेख सर्वप्रथम ऋग्वेदात आला आहे. पुढे बौध्द काळातील अनेक जातक कथा आणि बौध्द साहित्यात श्रेणी संघटनांचे अनेक ठिकाणी उल्लेख आलेले आहेत. अनेक व्यापारी आणि व्यावसाईकांच्या संघटना उदयास आल्या होत्या.[२] रिज डेव्हीडस् याने आपल्या ग्रंथात म्हटले की, बौध्दकाळात स्पष्टपणे १८ व्यावसाईकांच्या श्रेणी संघटना होत्या. त्यात - चित्रकार,

बांबूपासून टोपले बनविणारे, जहाज बांधणी करणारे, केशकर्तन करणारे, मिठाईवाले किंवा स्वयंपाकी, शिकारी, खाटीक, मासे धरणारे, कपडे रंगविणारे, हस्तीदंतीचे शिल्पी, कुंभार, चर्मकार, विणकर, दगडाचे शिल्प बनवणारे, लोहार, सोनार, तांबटकार, दागीने गुंफणारे[६] पण याशिवायही अनेक व्यावसाईकांच्या, व्यापाऱ्यांच्या, उद्योजकांच्या अनेक श्रेण्या असल्याचे आपल्याला दिसतात. पण त्यांची निश्चीत अशी आकडेवारी सांगता येत नाही.

**श्रेणी समुहरुपात होते -**

प्राचीन काळात अनेक श्रेणी होत्या. सुरक्षीततेच्या आणि संचालनाच्या सोईसाठी त्या अनेक व्यावसाईकांच्या श्रेणी समुहरुपात (वस्तीरुपात) राहत होत्या. कारण त्या व्यावसाईक श्रेणी त्यांच्या त्यांच्या व्यवसायावर आधारीत होत्या. आणि ते त्यांचे व्यवसाय वंशपरंपरागत चालत आले होते. कुमारावस्थेपासुनच ते लोक आपापला व्यवसाय शिकत होते. त्या काळात आपल्या व्यवसायातील बारकावे शिकत होते आणि आपल्या पित्याच्या मृत्युनंतर तो व्यवसाय ते पुढे चालवत होते.

उदा : हस्तीदंतीचे काम करणारे शिल्पी समुह रुपात एकाच परिसरात राहत होते. त्या वस्तीत दन्तकारविथी असे म्हणत होते.[४] त्याचप्रमाणे कुंभार व लोहार यांच्याही स्वतंत्र वस्त्या होत्या. ह्या वस्त्या नगराच्या आणि उपनगरांच्या विशिष्ट भागात किंवा जवळच होत्या. वाराणसीच्या जवळ वडुकिग्राम होते त्यात तांबटकारांचे ५०० कुटूंब होते. वाराणसीच्याच बाजूला कुंभारांचीही एक वस्ती होती.[५] केवळ मोठया शहरांच्या बाजूला नाहीतर, ग्रामांच्या मध्येही अशा व्यावसाईकांच्या वस्त्या होत्या. त्या वस्त्यांमध्ये १००० पर्यंत समव्यवसाईक कुटूंबे असल्याचे उल्लेख आहेत.[६]

**श्रेणीचे संचालन -**

व्यापार आणि व्यापाऱ्यांच्या सुरक्षीततेसाठी ह्या श्रेणींची निर्मिती झाली होती असेच दिसते. त्यासंबंधीचे प्रत्येक श्रेणींनी आपापले नियम, कायदे बनविले होते. आणि त्या त्या काळातील राजसंस्थांनीही त्यांच्या नियमांना मान्यता दिली होती. कारण त्यांनी ओळखले होते की, व्यापार - उद्योग वृध्दी म्हणजेच राष्ट्रवृध्दी होय. श्रेणीचे नियम पाळणे हे त्या श्रेणीतील प्रत्येक कुटूंबाचे परमकर्तव्य होते. त्या नियमांचे उल्लंघन करण्यांना कठोर शिक्षेचे प्रावधानही होते.[७] याज्ञवलक्य स्मृतीमध्ये उल्लेख आहे की, श्रेणीच्या संपत्तीचे कुणी गमन करत असेल तर त्याला देशातून बहीष्कृत करावे, त्याची सर्व संपत्ती जप्त करुन घ्यावी इत्यादी.[८]

श्रेणी संघटनेचे संचालन करण्यासाठी त्या प्रत्येक श्रेणींनी एक कार्यकारीणी बनविली होती. त्यांचा एक प्रमुख होता त्याला श्रेष्ठीण किंवा श्रेष्ठीय या नावाने ओळखले जात होते. श्रेष्ठीण व त्याच्या कार्यकारीणीची निवड लोकतांत्रीक पध्दतीने केली जात होती. श्रेणींच्या कार्यकारीणीत दोनपेक्षा जास्त सदस्यांची कार्यकारिणी होती. श्रेणीच्या कार्यकारिणीत असाच व्यक्ती निवडला जाऊ शकते जो इमानदार, योग्य, संयमी, धार्मीक तत्वांचा ज्ञाता, कर्तव्यनिष्ठ आहे.[९] जो व्यक्ती निष्क्रीय, भित्रा, लालची व अतिवयोवृध्द आहे अशा व्यक्तींना कार्यकारीणीत घेतले जात नव्हते. श्रेणीचा अध्यक्ष आणि त्याची कार्यकारीणी श्रेणीच्या नियमानुसारच आपल्या श्रेणीचे संचालन करीत होती. आपल्या श्रेणीतील निर्माण झालेल्या प्रश्नावर न्यायदान करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार होता. श्रेणीतील गैर वागणा-या व्यक्तीला ते दंड करु शकत होते. श्रेणीच्या नियमांना न मानणा-या व्यक्तींना श्रेणीतून बहिष्कृतही केले जात होते. [१०]

साधारणत: तत्कालीन राजे श्रेणींच्या कार्यपध्दतीत हस्तक्षेप करीत नव्हते. पण एखाद्या श्रेणीने आपल्या श्रेणीतील सदस्यावर पुर्वग्रह दुषीतपणे एखादी कार्यवाही केली असेल तरच राजा त्या श्रेणीत हस्तक्षेप करीत होता आणि राजा आपला निर्णय देत होता. [११] जर श्रेणीचा एखादा सदस्य शासनाचा कर भरत नसेल तर राजा त्याच्याकडून आठ पटीने कर वसूल करीत होता. असा जो सदस्य नगर सोडून जात होता तर त्याला धरुन आणून दन्डीत करीत होता. एखादी श्रेणी राज्यविरोधी वागत असेल तर तीला बरखास्त करण्याचा अधिकार राजाला होता.[१२] प्राचीन काळात प्रत्येक श्रेणीचे आपले कार्यालय, सभा भवन आणि त्यांचा विशिष्ट ध्वज होता. हरिवंशपुराणात उल्लेख आहे की, महाराज कंस च्या राजदरबारात श्रेणी प्रमुख आपापल्या ध्वजासह उपस्थित होते. श्रेणीची कार्यपध्दती लोकतांत्रीक पध्दतीने चालत होती. प्रत्येक श्रेणी सदस्याला आपले मत मांडण्याचा अधिकार होता. त्याला रोकले जात नव्हते.[१३]

श्रेणींना व्यापार उद्योग करण्याची सिमा निश्चित करुन दिली जात होती. कुणीही कुठेही व्यापार करु शकत नव्हता. जर केलाच तर त्याला दन्डीत केले जात होते.

उदा. - एक युवा व्यापारी दुसऱ्या श्रेणीच्या सिमेमध्ये (वाराणसी) जाऊन आपल्या जहाजातील संपूर्ण माल विकून बसला होता. त्यावेळी वाराणशीतील १०० व्यापारी तेथे आले. तेंव्हा त्यांना कळाले की, त्या युवकाने सर्व माल विकलेला आहे. तेंव्हा आलेल्या सर्व व्यापा-यांनी एक - एक हजार कार्षापण देऊन त्याचा सगळाच माल विकत घेतला आणि त्याला पुन्हा न येण्याबाबत समज दिली. [१४]

बौध्दकाळात श्रेणींच्या अध्यक्षांना न्यायव्यवस्थेतही

११० [college stamp]



विशेष स्थान दिले जात होते. श्रेण्या आपल्या श्रेणीतील व्यावसाईकांची भांडणेही मिटवत होती. त्या श्रेणीतील महिलांचे वाद - विवादही मिटवत होती. विनयपिटक ग्रंथात उल्लेख आहे की, एखाद्या स्त्रिला बौध्द भिख्खूणी व्हायचे असेल तर त्या स्त्रीला भिख्खुणी होण्यासाठी संबंधीत श्रेणीच्या कार्यकारीणीतील सदस्यांची मान्यता मिळवणे आवश्यक आहे.[१] त्यांच्या मान्यतेशिवाय कुण्याही स्त्रिला बौध्द भिक्षूणी होता येत नव्हते. स्वत: गौतमबुध्दाने अशा व्यावसाईक श्रेणींना उत्तम न्यायीक संस्था असे म्हटले होते.[१]

रामायण व महाभारत काळातही श्रेणींना व श्रेष्ठीण यांना विशेष स्थान होते. श्री रामाच्या राज्यभिषेक प्रसंगी त्यांची पत्नी सिता यांनी रामाला म्हटले की, आज राजदरबारात कुण्याही श्रेणीचे प्रमुख दिसत नाहीत.[१] जेंव्हा श्रीराम आपला वनवास संपवून आयोध्येत परत आले होते तेंव्हा त्यांच्या स्वागतासाठी अनेक मान्यवर व लोक उपस्थित होते. त्याचवेळी अनेक श्रेणींचे प्रमुखही उपस्थीत होते.[१८] महाभारतात उल्लेख आहे की, राजाने शत्रुवर आक्रमण करण्याच्या अगोदर आपल्या गुप्तेहारांमार्फत शत्रु राज्यातील श्रेणी प्रमुखांशी विचार - विनियम केला पाहिजे.[१९] महाभारतातील वनपर्व अध्यायात एक कथा आहे त्यानुसार जेंव्हा दुर्योधन गंधर्वाकडून पराभूत झाला होता. आणि राजधानीकडे परत येण्यासाठी निघाला तेंव्हा त्याच्या मनात एक संकोच भावना निर्माण झाली होती. म्हणुन तो म्हणतो की, मी आता राजधानीत गेल्यावर ब्राम्हणगण आणि श्रेष्ठींना काय म्हणुन तोंड दाखवू.[२०]

कांही श्रेणी आपली सेनाही बाळगून होते. कांही वेळा राजांनी श्रेणींकडून सैनिकी मदत घेतल्याचे उल्लेखही आहेत. कौटील्याने आपल्या अर्थशास्त्र ग्रंथात म्हटले की, कांही क्षेत्रीय वर्णीयांच्याही श्रेणी होत्या. त्या श्रेण्या व्यापा-यांना आणि राजाला आपली सैनिकी मदत पुरवत होत्या. आणि त्यातून आपली उपजिवीका चालवित होत्या.[२१]

श्रेणीचे आर्थीक व्यवहार -

प्राचीन श्रेणी संघटना आजच्या बँकासारखे काम करीत होते. गरजूंना कर्ज देत होते. लोकांच्या ठेवी ठेवून घेऊन त्यावर व्याज देत होते. कांही श्रेण्यांनी स्वत:ची नाणीही पाडल्याची अनेक उदाहरणे आहेत. तशा प्रकारचे कांही नाणे तक्षशिला येथे सापडले आहेत. तर कांही कौशांबी येथे सापडले आहेत. कौशांबी येथे सापडलेल्या नाण्यावर गंधिकनम् असे कोरलेले होते. त्यावरुन स्पष्ट होते की, ते नाणे सुगंधी द्रव्य बनविणाऱ्या श्रेणीचे होते. ही दोन्ही नाणी इ.स. पु. दुस-या शतकातील होती. प्राचीन काळातील श्रेणी संघटनांचे कांही नाणी पाडण्याच्या मुद्रा (ठसे) ही सापडल्या आहेत.[२२] प्राचीन काळातील श्रेणी ह्या आर्थिकदृष्टया संपन्न होत्या त्या कधी - कधी राजालाही कर्जे देत होत्या. लोकांच्या व राजाच्या ठेवीही ठेवून घेत होत्या आणि त्यावर व्याज देत होत्या. कांही ठेवीदारांच्या म्हणण्यानुसार ठेवींवर व्याज देत नव्हती. पण त्या व्याजातून धार्मीक व सामाजिक कामे करीत होती. श्रेणी त्या ठेवींवर एक टक्का ते पाऊण टक्का व्याज देत होती. श्रेणींमध्ये ठेवल्या जाणाऱ्या ठेवींची कायदेशिर नोंद नगरांच्या रजिस्टरमध्ये केली जात होती.[२३]

श्रेणींचे धार्मीक व सामाजिक योगदान -

प्राचीन काळात श्रेणींनी तत्कालीन आर्थीक व्यवहार बरेच सुकर केले होते. श्रेणींची स्वतंत्र कार्यालये होती. श्रेणीतील सर्व सदस्यांच्या संमतीनेच आर्थीक व्यवहार केले जात होते. त्याचप्रमाणे श्रेणींनी कांही धार्मीक व सामाजिक कामेही केली होती ती पुढीलप्रमाणे.

१) इ.स. १०६ मध्ये मथुराचा राजा हुविष्क याच्या काळातील एक शिलालेख सापडला त्यानुसार ११०० पुराण (नाणे) एवढी ठेव त्या राजाने दोन श्रेणींकडे ठेवली होती त्यातील एक श्रेणी पीठ तयार करणा-यांची होती. तर दुस-या श्रेणीचा स्पष्ट उल्लेख नाही. त्या शिलालेखावर उल्लेख आहे की, त्या ११०० पुराण एवढया ठेवीवरील जो कांही व्याज होईल त्या व्याज्याच्या पैशातून महिन्यात एकदा त्या श्रेणींनी ब्राह्मणांना भोजन दयावे.२४

२) इ.स. १२० चा नाशिकचा शिलालेख हा शक-क्षत्रप राजा नहपान याचा जावई उपवदात याचा आहे. त्याने दोन विणकरांच्या श्रेणीत ठेवी ठेवल्या. पैकी एका श्रेणीत २००० कार्षापण (नाणे) तर दुसरीमध्ये १००० कार्षापण ठेव म्हणून ठेवले त्यावर अनुक्रमे वार्षीक १२% आणि ९% एवढा व्याज येत होता.

त्यातील २००० कार्षापणचा व्याज बौध्द भिख्खूंच्या वस्त्रांवर खर्च करावा आणि १००० कार्षापणावरील व्याज बौध्द भिख्खुंच्या इतर गरजांवर खर्च करावा असे त्या शिलालेखात म्हटले.[२५]

३) इ.स.च्या तिस-या शतकातील इश्वरसेनच्या नाशिक येथील शिलालेखात म्हटले की, इश्वरसेनने श्रेणीकडे कांही धनराशी ठेव म्हणून ठेवली आणि त्याच्या व्याजातून संघाराम मध्ये राहणा-या रोग्यांचे औषधोपचार करण्यात यावे असे म्हटले.[२६]

४) जुन्नर येथील कांही शिलालेखातही उल्लेख आहे की, कांही श्रेणींनी धार्मीक कार्यात आपला पैसा खर्च केला आहे.[२७]

५) स्कंदगुप्ताचा इंदोर येथे एक ताम्रपट सापडला. स्कंदगुप्ताने तेली लोकांच्या श्रेणीत कांही ठेव जमा केली. त्या ठेवीच्या व्याजावर तेथील सुर्यमंदीरातील दिवा सतत तेवत ठेवण्यास सांगीतले.[२८]

६) कुमारगुप्त पहिलाचा मंदसोर येथील शिलालेख आहे. कुमारगुप्तने रेशीम कापड विनणा-या श्रेणीकडे कांही ठेव ठेवली होती. पुढे ती श्रेणी स्थलांतरीत होवून लाट देशात दशपूर येथे

Degloor College * Dist.Nanded *



त्यांईक झाली आणि त्या श्रेणीने दशपूर मध्ये कुमारगुप्तच्या देर्वीवरील व्याजातच दशपुरमध्ये एक मंदिर बांधले व त्याची देखभाल करीत राहिले. ¹⁶

७) गुप्तकाळात इंद्रपूरच्या देवविष्णू नावाच्या एका ब्राह्मणाने इंद्रपुरच्याच तेल्यांचा एका श्रेणीकडे कांही ठेव जमा केली आणि त्याच्या व्याजात इंद्रपूरच्या सुर्यमंदीरातील दिवा सतत तेवत ठेवण्यास सांगितले.¹⁷

८) चंद्रगुप्त दुसरा ने दोन श्रेणीकडे ५० दिनार (नाणे) एवढी ठेव ठेवली होती. त्या ठेवीच्या व्याजातून दोन ब्राह्मणांचा खर्च भागविला जात होता. तसेच कुमारगुप्तनेही दोन श्रेणीकडे २५ दिनार एवढी ठेव ठेवली होती. ¹⁸

९) कांही श्रेण्या लोककल्याणाची कामेही करीत होते असे - नगरातील सभा भवनांचे निर्माण, यात्रेकरूसाठी पाणपोईचे निर्माण, मंदिर, तलाव, कालवे यांचे निर्माण तसेच जे गरीब लोक होते त्यांच्या जन्माचा, उपनयनाचा, विवाहाचा, अंत्येष्टी इत्यादी संस्कारावरही आपला पैसा खर्च करीत होती. जुन्नर येथील शिलालेखावरून कळते की, धान्याचा व्यापार करणा-या श्रेणीने जुन्नर येथील लेणीचे निर्माण करविले व तेथे एक जलकुंडही बांधले. ¹⁹

अशाप्रकारे प्राचीन काळातील श्रेणी संघटना ह्या तत्कालीन आर्थीक व्यवहारात महत्वाची भूमीका तर पार पाडतच होते. शिवाय सामाजीक, धार्मीक योगदानही देत होते. आपल्याच ठरविलेल्या नियमाप्रमाणे त्यांचे संचालन होत होते. त्यांच्याकडे भरपूर निधी आणि मालमत्ताही होत्या. म्हणून त्यांनी स्वत:चे सैन्यही ठेवले होते. त्या श्रेणींची महत्ता तत्कालीन राजांनी ओळखली होती आणि त्यांनी श्रेणींच्या प्रमुखाना प्रशासनात आणि न्यायव्यवस्थेत महत्वाचे स्थान दिले होते. सातवाहन काळात श्रेणींनी न्यायव्यवस्थेत महत्वाची भूमीका पार पाडली होती. मुद्राराक्षस नाटकात उल्लेख आहे की, चन्दनदास नावाच्या श्रेष्ठीला न्यायदान करण्याचे विशेष अधिकार प्रदान करण्यात आले होते. मृच्छकटीक नाटकातही अनेक श्रेष्ठींनी न्यायदान केल्याची अनेक उदाहरणे आहेत. प्राचीन काळातील राज्यव्यवस्थेतही श्रेणी व त्यांच्या प्रमुखांनी फार मोठे योगदान दिले होते.

संदर्भग्रंथ सुची -


१) ऋग्वेद १/१६३/१०

२) Social Organization - Dr.Fick, p. ४८

३) बुध्दीस्ट इंडीया - रीज डेव्हीडस् , पृ. ९०-९६

४) जातक (इंग्रजी अनुवाद) ई.बी.कॉवेल, केम्ब्रीज (१८९५-१९१३) भाग - १, पृ. ३७६

५) उपरोक्त भाग - ३, पृ. २८१

६) पुर्वोक्त, ४, समुद्रवणिज जातक , पृ. २६१

७) मनुस्मृती - मेधातिथी भाष्य सहित, कलकत्ता - १९३२-३९, पृ. २२८-२२९

८) विष्णुस्मृती - पृ. १९८

९) बृहस्पतीस्मृती , पृ. ११-१२ (एम.ज्युहार, लिपझीग, १८७९)

१०) उपरोक्त, पृ. १३-१५

११) बृहस्पतीस्मृती, पृ. १९ (एम.ज्युहार, लिपझीग, १८७९)

१२) बृहस्पतीस्मृती पृ. २०-२२ / नारदस्मृती १०, पृ. ४-७ (एम.ज्युहार, लिपझीग, १८७९)

१३) हरिवंशपुराण, पृ. ५

१४) पुर्वोक्त - ४, चुल्लसेटी जातक, पृ. ११४

१५) विनयपिटक, पृ. २२६ (हिन्दी अनुवादक, राहूल सांस्कृत्यायन, सारनाथ, १९३५)

१६) गौतम, ११/२३

१७) रामायण, ७/७७/ २ (भगवद्त्त द्वारा संपादीत, लाहोर, १९३१)

१८) उपरोक्त, ६/१२६/४ (भगवद्त्त द्वारा संपादीत, लाहोर, १९३१)

१९) महाभारत, १२/५९/१४३ (निलकंठ की टिकासहिता, पुना, १९२९-३३)

२०) महाभारत , ३/२४८/१६ (निलकंठ की टिकासहिता, पुना, १९२९-३३)

२१) कौटिल्य अर्थशास्त्र, संपादक, आर शामशास्त्री, मैसूर, १९०९, पृ. ३७६

२२) क्वायंस ऑफ एंशिएन्ट इंडीया, कनिंघम , पृ. ६३

२३) उपरोक्त, पृ. ६४

२४) एपिग्राफी इंडीया, डी.सी.सरकार, प्लेट क्रं. २१, ६०

२५) उपरोक्त, प्लेट क्रं. ८६

२६) आर्कियोलॉजीकल सर्वे ऑफ इंडिया, ४, लुडर्स पृ. १६५

२७) उपरोक्त, पृ. १६६

२८) कार्पस इन्सक्रिप्शन इंडिकेरम, फ्लीट, भाग - ३, पृ. ७०

२९) उपरोक्त, पृ. ७१

३०) इंदौर ताम्रपट, सो.इं. १, पृ. ३०९-१२

३१) क्वाईन्स ऑफ एन्सीएन्ट इंडिया, कनिंघम, पृ. ३७-३८

३२) उपरोक्त, पृ. १८०




Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded